# पोलीस अधीक्षक कार्यालय
# बुलढाणा

## पोलीस ठाणे अंढेरा यांची कामगीरी, अफुचे शेतीवर पोलीसांचे नांगर

दि. २२/०२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा बुलडाणा यांचे पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, आरोपी संतोष मधुकर सानप रा. अंढेरा ता. देऊळगांव राजा याने त्याचे अंढेरा शिवारातील गट नं. ६१५ मधील मालकीच्या शेतात अफूच्या झाडांची लागवड करुन, संगोपन केलेले आहे. अशा खात्रीलायक खबरेवरुन आरोपी संतोष मधुकर सानप रा. अंढेरा ता. देऊळगांव राजा याने त्याचे शेतात चोहोबाजुने मक्याचे पिक लावले होते व सदर मक्याचे पिकाच्या मध्यभागी हिरव्या जाळीदार कापडाच्या आच्छादनाखाली अफूचे पिक १० गुंठयात अशा प्रकारे छुप्यारीतीने लावले होते.

सदर आरोपीच्या शेतातून हिरवी ओलसर अफूची लागवड व संगोपन केलेली झाडे वजन-१५७२ कि.१०० ग्रॅम, किंमती १२,६०,२८,०००/-रु. किमतीचा मुद्देमाल राजपत्रीत अधिकारी व शासकिय पंचासमक्ष जप्त करण्यात आली. फिर्यादी पोउपनि सचिन कानडे नेमणूक स्था.गु.शा. बुलढाणा यांचे फिर्यादवरुन आरोपी संतोष मधूकर सानप वय ४९ वर्षे, रा. अंढेरा ता. देऊळगांव राजा याचे विरुध्द पो.स्टे. अंढेरा जि. बुलढाणा येथे अप.नं. ५२/२०२५ कलम ८ (क), १८ (क) एन.डी.पी.एस. ॲक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.